INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 8.031 (SJIF 2025)

# सामाजिक विघटन : एक सामाजिक समस्या

## (Social Disintegration : A Social Problem)

**प्रा.डॉ.आर.डी. खताळ**

समाजशास्त्र विभाग प्रमुख,
कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
शिवाजीनगर, गढी, ता. गेवराई, जि. बीड
E-mail: prof.ramdaskhatal@gmail.com

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/02.2025-34677727/IRJHIS2501007

**प्रस्तावना:**

मानवी समाजाचे अस्तित्व टिकवण्यासाठी संघटन आवश्यक असते. परंतु काही समाजात सामाजिक विघटनाची प्रक्रिया अधिक प्रमाणात दिसून येते. मानवी समाजाची रचना आणि कार्यपद्धती या संदर्भात स्पष्टीकरण करताना सुप्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ रॉबर्ट मर्टन यांनी असे मत व्यक्त केले आहे की, प्रत्येक समूहात एकता असणे महत्त्वाचे आहे परंतु सर्वच समूहांतती एकता सारख्याच प्रमाणात दिसून येते असे नाही. कारण काही समूहात सामाजिक आदर्शांना जास्त महत्त्व असते. तर काही समाजात सामाजिक आदर्शांना विशेष महत्त्व दिले जात नाहीत. उदा. ग्रामीण समाजात काही सामाजिक आदर्शांना विशेष महत्त्व दिले जाते तेच आदर्श शहरी समाजात महत्त्वाचे मानले जात नाही. समाज व्यवस्था नेहमी संघटन, विघटन आणि पुनर्घटन या तीन प्रक्रियातून जात असते कोणताही समाज पूर्णपणे संघटित नसतो संघटनाची ही प्रक्रिया कमी-अधिक प्रमाणात दिसून येते. ज्या समाजात संघटन प्रक्रियेचा अधिक प्रभाव असतो अशा समाजात सामाजिक प्रश्न निर्माण होत नाहीत. परंतु ज्या समाजव्यवस्थेत विघटन प्रक्रियेचा अधिक प्रभाव असतो अशा समाजव्यवस्थेत निरनिराळे प्रश्न निर्माण झालेले दिसून येतात. जे संघटित नाही त्याला विघटन म्हणतात.

सामाजिक संघटन समाजातील सरलता टिकवून ठेवीत असले, तरी नेहमी तसेच चालू राहते असे नाही. प्रत्येक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीहून भिन्न असते. तिच्या आवडी-निवडी भिन्न असतात.सार्वजनिक नियमांचे पालन करण्याची वृत्ती भिन्न असते. यामुळे मतभेद होऊन संघर्ष उद्भवतो आणि फाटाफूट वाढत जाते. माणसे परस्परविरोधी वर्तन करतात. त्यामुळे हितसंबंध बिघडतात हेवेदावे, भांडणे, कटकारस्थाने सुरू होतात. संघटन मोडते, ऐक्याला धोका होतो आणि समाजात अशांतता निर्माण होते. मतभेद ताणले जाऊन समूहांमध्ये भेदनीय परिस्थिती निर्माण होते, त्याला सामाजिक विघटन म्हणतात. सामाजिक विघटनामुळे समाजाचे नुकसान होते संघर्षात हिंसा, आक्रमण, क्रूरता अशा समाज विघातक कृती व वर्तनांचा अवलंब केला जातो. कुटुंब, नातेवाईक, शेजारी, गाव या समूहांचे अतोनात नुकसान होते.विघटनाची सुरुवात स्पर्धेने होते. स्पर्धा ही साधनसामग्री कमी आणि मागणी जास्त यांमुळे होते स्पर्धा आणि चढाओढ

विकासाला पोषक असू शकतात.मात्र त्यांत खेळमेळीचे व निकोप विचारांचे संयमित धोरण असावे लागते गैरमार्गांचा अवलंब झाला आणि स्पर्धात्मक वर्तनांच्या मर्यादा ओलांडून स्वार्थ बोकाळला, तर विघटन होते.

**सामाजिक विघटनाचा अर्थ व व्याख्या** (Meaning of Social Disorganization)

**१) इलियट आणि मेरिल** : "सामाजिक विघटन म्हणजे सामाजिक संतुलनात बिघाड होणे व त्याचे जुनेसामाजिक स्वरूप नष्ट होणे होय"

**2) गिलिन आणि गिलीन :** ''सामाजिक विघटन म्हणजे संपूर्ण सांस्कृतिक संघटनेमध्ये निर्माण होणारी जोरदारसामाजिक दुरावस्था किंवा अपसमायोजन होय."

**3) न्यूमेयर :** "सामाजिक विघटन ही एक असंतुलित अवस्था नाही कारण की, ही एक मुख्यतः सामाजिक प्रक्रिया आहे आणि या प्रक्रियेमुळे घटना व वृत्ती यांच्यावर परिणाम होत असतो त्यामुळे व्यक्ती आणि समूह यांच्या कार्यात बाधा निर्माण होते"

**संशोधनाचा उद्देश :**

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने संशोधन विषयाच्या अनुषंगाने निश्चित केलेले उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत

I)भारतातील सामाजिक विघटनाची प्रक्रिया स्पष्ट करणे

II)भारतीय समाजातील विघटनाचे स्वरूप विशद करणे

**गृहीतके** :

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अनुषंगाने निश्चित केलेले गृहीतके खालील प्रमाणे आहेत.

I)भारतीय समाजात विघटनाची प्रक्रिया पारंपारिक काळापासून सुरू आहे

II)सामाजिक विघटनाची प्रक्रिया निरंतर चालणारी आहे

**सामाजिक विघटन :**

सामाजिक विघटनात दारिद्र्य आणि बेकारी वा आर्थिक समस्यांचा सहभाग असल्याने या समस्या का आणि कशा आहेत हे समजून घेणे महाकठीण कार्य आहे कारण या समस्यांना जशी आर्थिक परिस्थिती कारणीभूत आहे तशीच सामाजिकसुद्धा आहे या देशातील जे लोक गरीब आहे ते काही अंशी दैववादी असल्यामुळेच गरीब आहेत हे विसरता येणार नाही दारिद्र्य आणि बेकारीमुळे नैतिकतेचा हास होऊन असंख्य स्त्रिया शरीराचा बाजार मांडून बसल्या आहेतआर्थिक विकास पूर्ण देशभर न झाल्याने आदिवासी आणि ग्रामीण भाग अद्यापही मागासलेले आहेत. रस्ते, वीज, पाणी, दवाखाने, शाळा, मनोरंजनाची साधने इत्यादींची गैरसोय असल्याने डॉक्टर्स, वकील, इंजिनिअर वगैर लोक खेडयात जाऊन खेड्यांचा विकास करण्यास तयार नाहीतशिक्षण आणि व्यवसायात नवी पद्धत अमलात न आणल्यामुळे शेतीच्या उत्पादनात वाढ होत नाही. सामूहिक विकास योजनेच्या आराखड्याखाली ग्रामीण विकासाच्या योजना राबविल्या जात नाहीत.शहरात प्रचंड प्रमाणात सुखसोयींची रेलचेल असल्याने खेड्यातील माणूस शहराकडे आकर्षित झाला आहे अधिकाधिक लोक शहरात जाऊन राहत आहेत. शहरात रस्ते, पाणी, वीज, दवाखाने, शाळा, महाविद्यालये, मनोरंजनाची साधने अशा इतर अनेक सुखसोयी आहेत. तथापि, भयानक गर्दीमुळे झोपडपट्ट्यांची वाढ होऊनगुंडागर्दी, वेश्याव्यवसाय, भिकारी, रोगी, दारू, सट्टा, मटका वगैरे अनैतिक व्यवसायांनी प्रचंड पीक आले आहेघराची टंचाई असल्याने एकाच ठिकाणी सर्वांना झोपावे लागते.देशातल्या राजकारणाला वेगळे वळण लागल्याने नवीन समस्या उदयाला आल्या तर आहेच. पण या समस्यांनी म्हणजे राजकीय अपप्रवृत्तींनी इतर क्षेत्रातील समस्यांनासुद्धा निर्माण केल्याचे श्रेय घेतले आहे. प्रत्येक संघटनेत स्वार्थ बळावल्याने नको त्या समस्या निर्माण झाल्या आहेत. जातीय, धार्मिक, पंथीय, प्रांतिक,

पक्षीय, भाषिक दंगलींना या देशात कमी नाही. दररोज कोठे ना कोठेतरी जात, पंथ, धर्म इत्यादींच्या नावावर संघर्ष छेडला जात आहे. राजकीय अपप्रवृत्तीच्या विचारामुळे गुंडगिरी, भ्रष्टाचार, अनैतिकता, काळाबाजार इत्यादीना वारेमाप पीक आले आहे.तळागाळातल्या सर्व लोकांसाठी शिक्षण सक्तीचे केले असले तरी त्यासाठी ज्या व्यवस्था करायला पाहिजे होत्या त्या केल्या नाहीत म्हणून 'असून संताप, नसून ताप' अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. शाळा, ग्रंथालये, क्रीडांगणे, खेळांची साधने इत्यादी अत्यंत कमी असल्याने मुलांच्या शिक्षांची हेळसांड होत आहे. प्रशिक्षित शिक्षक आणि त्यातल्या त्यात जिज्ञासू शिक्षकांची कमतरता असल्याने शिक्षण क्षेत्राला बाजारूपणा आला आहे. अत्यंत लहान जागेत मुलांना बसवून शिकविले जाणे, अप्रशिक्षित शिक्षकांचा शिकविण्यातील आळस, शिक्षक, जात, धर्म व पंथाचा आधार घेऊन शिक्षकाची काम न करण्याची प्रवृत्ती, समाज तथा आई - वडिलांचा आपल्या पाल्याबद्दलचा निष्काळजीपणा इत्यादीमुळे शिक्षणक्षेत्रात विविध प्रकारच्या समस्या निर्माण झाल्या आहेत.कोणताही धर्म चांगले संस्कार घडविण्याची प्रेरणा देत असतो.बंधुत्व, समानता, त्याग, प्रेम, सहकार्य अशा अनेक चांगल्या बाबी कोणत्याही धर्माने त्यांच्या अनुयायांसाठी निर्माण केलेल्या असूनसुद्धा भारतातील असे काही लोक आहेत की ते निव्वळ धर्माच्या नावावर दंगली कशा घडवून आणल्या जातील याचाच विचार करीत असतात. कर्मकांड, धर्मवेडेपणा, धर्मांधता परधर्मीयांबद्दल तिरस्कार, स्वधर्माबद्दल अभिमान या अशा अनेक बाबींमुळे समाज दुभंगला जाऊन नको त्या समस्या निर्माण झाल्या आहेत. धार्मिक दंगलीमुळे हजारोंचे संसार उद्‌ध्वस्त झाले आहेत.कर्ते पुरुष मारले गेले आहेत. अबलांची अब्रू लुटली जाऊन धार्मिक स्थळांचा विध्वंस करण्यात आला आहे.

**समारोप** :

समाजातील निरनिराळ्या गटांमध्ये विशिष्ट उद्दिष्ट साधण्याच्या हेतूने आणि परस्परसंबंध प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने विविध क्रिया, प्रतिक्रिया, आंतरक्रिया घडत असतात. त्या नियंत्रित करण्यासाठी, त्यांची कामे किमान काही शिस्तीने व्हावीत, यांसाठी संघटनांची निर्मिती होते आणि समान हितसंबंधांमुळे आणि सामुदायिक प्रयत्नांतून त्या संघटना कार्यरत राहतात. संघटन म्हणजे विविध गुणधर्मांचे, विविध धर्मांची उपासना करणारे आणि विविध व्यवसाय करणारे लोक समान उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी एकमेकांना आवडेल अशी जीवनपद्धती स्वीकारतात. त्यासाठी ते आपसांतील भेद आणि भिन्न आचार-विचार तात्पुरते विसरतात किंवा बाजूला ठेवतात. एका प्रकारे संघटन करताना त्याग करावा लागतो. संघटित समूह आणि सहजासहजी एकत्र झालेले लोक यांत फरक असतो. रस्त्यावरची गर्दी, सभेचा श्रोतृवृंद, चित्रपट वा सर्कशीचा प्रेक्षकवर्ग यांना 'संघटन' म्हणता येणार नाही. ही मंडळी, कोण्या एकाच्या बोलविण्यावरुन तिथे आलेली नसतात, ती काही निमित्ताने एकत्रित आलेली असतात, ती परस्परांना अपरिचित असतात व त्यांना परस्परांच्या सहकार्याची गरज असतेच असे नाही.

**संदर्भसूची:**


1. Coleman James S., Foundations of Social Theory.
2. राजेंद्र कुमार शर्मा और रामनाथ शर्मा, सामाजिक विघटन.
3. डॉ.दा.धो.काचोळे, सामाजिक समस्या.
4. केस होली, सामाजिक प्रश्न.
5. मिल्स सी राईट, समाजशास्त्री कल्पनाशक्ती.